आपली सेवा आमचे कर्तव्य

विभागाच्या संकेतस्थळावरील मुखपृष्ठासाठी मजकुर

महाराष्ट्र राज्यातील नागरिकांना शासनामार्फत व शासनाचे अधिनस्त सर्व सार्वजनिक प्राधिकरणांमार्फत दिल्या जाणा-या अधिसूचित सेवा पारदर्शक, गतिमान व विहित कालमर्यादेत देण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ पारित करण्यात आला असून तो दि. २८.०४.२०१५ पासून अंमलात आहे. नागरिकांना सुलभ व कालमर्यादित सेवा मिळाव्यात हे त्याचे उद्दिष्ट आहे.

वरीलप्रमाणे अधिसूचित सेवा नागरिकांना दिल्या जात आहेत किंवा नाही यावर देखरेख, समन्वय, सनियंत्रण ठेवण्यासाठी व या संदर्भात सुधारणा सुचविण्यासाठी उपरोक्त कायद्यान्वये महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग गठीत करण्यात आला असून आयोगामध्ये एक मुख्य आयुक्त व सहा आयुक्त कार्यरत आहेत. आयोगाचे मुख्यालय नविन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई येथे असून सहा विभागातील मुख्यालयाच्या ठिकाणी आयुक्तांची कार्यालये आहेत.

पात्र नागरीकांना विहित वेळेत सेवा न मिळाल्यास अथवा नियमोचित कारणाशिवाय ती नाकारल्यास अशा निर्णयाविरुद्ध संबंधितांना वरीष्ठांकडे प्रथम व द्वितीय अपिल करता येते व तरीही समाधान न झाल्यास आयोगाकडे तृतीय अपिल करता येते. कसूरदार अधिका-यास प्रतिप्रकरण रु. ५०००/- पर्यंत दंड होऊ शकतो.

महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाची वेबसाईट खालीलप्रमाणे आहे https://aaplesarkar.mahaonline.gov.in

# महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,2015
# व
# महाराष्ट्र राज्यसेवा हक्क आयोगाबाबतची संक्षिप्त माहिती

शासनाच्या विविध विभागास व प्राधिकरणांमार्फत दिल्या जाणा-या वेगवेगळया सेवा काही वेळा सामान्य माणसापर्यंत पोहचत नाहीत. किंवा त्या सेवा प्राप्त करण्यासाठी नागरीकांना अनेकवेळा प्रयत्न करावे लागतात. या परिस्थितीमध्ये आमूलाग्र बदल करण्यासाठी राज्याने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 हा क्रांतिकारी कायदा केला आहे. नागरीकांना शासनाच्या अधिसूचित सेवा प्राप्त करुन घेण्याचा अधिकार देणारा व प्रशासनाला जबाबदार व उत्तरदायी बनविणारा हा कायदा आहे. या कायद्यामुळे नागरीकांना तत्परतेने, विहीत कालावधीत सहज व सुलभपणे सेवा मिळणे शक्य होत आहे.

आतापर्यंत शासनाच्या विविध विभागांच्या पाचशेहून अधिक सेवा या कार्यद्यांतर्गत अधिसुचित करण्यात आल्या असून यापैकी सुमारे चारशे सेवा या "आपले सरकार पोर्टलवर" तसेच "आर.टी.एस. महाराष्ट्र" या मोबाईल ॲपवर ऑनलाईन उपलब्ध आहेत. घरी बसूल नागरिक त्या सेवा प्राप्त करु शकतात. तसेच आपल्या गावातील "आपले सरकार सेवा केंद्रावर" जाऊन देखील या सेवांचा लाभ मिळू शकतो. या अधिसूचित सेवांची यादी प्रत्येक कार्यालयात दर्शनीभागी व संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्याचे निर्देश आहेत. वरील प्रमाणे अधिसूचित सेवा दिल्या जात आहेत किंवा नाही यावर देखरेख, समन्वये, सनियंत्रण ठेवण्यासाठी व यासंदर्भात सुधारणा सुचविण्यासाठी उपरोक्त कायाद्याखाली "महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग" गठीत करण्यात आला असून "आपली सेवा आमची कर्तव्य" असे आयोगाचे ब्रीद वाक्य आहे. आयोगामध्ये एक मुख्य आयुक्त व सहा आयुक्त कार्यरत आहेत. आयोगाचे मुख्यालय नविन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई येथे असून सहा विभागांच्या मुख्यालयाच्या ठिकाणी आयुक्तांची कार्यालये आहेत. पात्र नागरीकांना विहित वेळेत सेवा न मिळाल्यास अथवा नियमोचित कारणाशिवाय ती नाकारल्यास त्या विरुध्द वरिष्ठांकडे प्रथम व द्वितीय अपिल करता येते. तेथेही समाधान न झाल्यास आयोगाकडे तृतीय अपिल करता येते. कसूरदार अधिका-यास रु. 5000/- पर्यंत दंड होऊ शकतो.

याबाबत अधिकची माहिती https://aaplesarkar.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.